# ‘मी रत्नागिरीचा’ सांगण्यात वाटतो अभिमान

## बीसीसीआयचे उपाध्यक्ष रवि सावंत यांनी व्यक्त केल्या भावना

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

तुम्ही कुठचे असं मला कुणी विचारलं की माझ्याची नकळत तोंडातून ‘मी रत्नागिरीचा’ हेच शब्द येतात. मी रत्नागिरीकर असल्याचा मला सार्थ अभिमान आहे अशा शब्दांत बीसीसीआयचे उपाध्यक्ष रवी सावंत यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

रत्नागिरीत सुरू असलेल्या ‘शोध मराठी मनाचा’ जागतिक मराठी संमेलनामध्ये झालेल्या ‘मुक्काम पोस्ट रत्नागिरी’ या कार्यक्रमातून रत्नागिरीविषयीची आपुलकी त्यांनी व्यक्त केली. आई- वडिल मिऱ्यावरचे, नोकरीनिमित्ताने मुंबईला गेले, त्यामुळे संपुर्ण आयुष्य मुंबईत गेले असले तरीही शाळेतली प्रत्येक उन्हाळी सुट्टी मिऱ्यावरच गेली. इथेच झाडावरचे आंबे पाडताना बॉलचा थ्रो शिकता आला. वडिलांमुळे क्रिकेटचं वेड लागलं, दहावीत मिळालेल्या ३९ टक्क्यांमुळे सीएचं शिक्षण घेण्याची उर्मी निर्माण झाली, मित्राने



**रत्नागिरी : जागतिक मराठी संमेलनामध्ये ‘मुक्कामपोस्ट रत्नागिरी’ कार्यक्रमामध्ये अनुभव कथन करताना रवी सावंत, सोबत डावीकडून उदयदाद लाड, जयू भाटकर, मंदार जोगळेकर. (छाया: माऊली फोटोज्)**

शिकवलेल्या गणितामुळे पैकीच्या पैकी गुण मिळाल्याने लक्षपुर्वक शिकलं तर काहीही कठीण नाही हा मुलमंत्र मिळाला आणि बोर्ड ऑफ कंट्रोल फॉर क्रिकेट इन इंडिया अर्थात बीसीसीआयचा उपाध्यक्ष झालेला रवी सावंत घडला अशा शब्दात त्यांनी आपली कहाणी मांडली. अनेक देशविदेश पाहिले, परंतु रत्नागिरीकर ही ओळख सांगण्यात आजही अभिमान वाटतो असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी सचिन तेंडुलकर का घडला आणि विनोद कांबळी का मागे राहिला याचे उदाहरण दिले. राहुल द्रविडचा सुशिक्षितपणा, गावसकराचा नम्रपणा, दिलीप सरदेसाईंचं मोठेपण विविध उदाहरणांद्वारे सांगितले. या कार्यक्रमामध्ये जागतिक मराठी अकादमीचे कोषाध्यक्ष आणि उद्योजक उदयदादा लाड, सह्याद्रीचे निर्माता दिग्दर्शक जयू भाटकर, इ- बुकचे प्रणेते मंदार जोगळेकर या रत्नागिरीच्या सुपुत्रांनीही भाग घेतला होता. त्यांच्या यशस्वी जीवनाचे रहस्य त्यांनी उपस्थितांना सांगितले. उदयदादा लाड यांनी शिक्षक व्हायची इच्छा आहे, कमी शिकल्याचं दु:ख आहे पण ७१ व्या वर्षीही शिकण्याची इच्छा कायम आहे असे सांगून तरूणांनाही लाजविले. तर कमावलेल्या प्रत्येक पैशाचा योग्य विनियोग होण्यासाठी चांगल काहीतरी करण्याचा नेहमी प्रयत्न असतो असे सांगितले. रत्नागिरीतील शैक्षणिक दिवसांच्या आठवणींही त्यांनी कथन केल्या.

जयू भाटकर यांनी रत्नागिरीतील घुडेवठार येथून सुरू झालेले आयुष्य मुंबईतील कलानगरीत कसे पोहोचले, त्यासाठी त्यांच्या आईसह शिक्षक, मित्र कसे उपयोगी पडले, त्यांचे आकाशवाणीवरचे पदार्पण असे अनेक किस्से आठवणींसह उलगडले. यावेळी नितीन केळकर आणि सुहास विद्वांस यांनी सूत्रसंचालन केले.